दिनांक  13/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.44

विषय – नगरपरिषदेचे सन 2022-2023 चे वार्षिक लेख्यास मंजूरी देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी लेखापाल यांचे दिनांक 12/07/2023 रोजी मंजूर केलेले सन 2022-2023 चे वार्षिक लेखे .

लेखा विभागाकडील अहवालानुसार नगरपरिषदेचे सन 2022-2023 चे जमा खर्चाचे वार्षिक लेखे तयार केले असून सदर वार्षिक लेख्यास महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 102 नुसार कौन्सील सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.सदर वार्षिक लेख्याचा तपशिल खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| दिनांक 01/04/2022 ची आरंभीची शिल्लक | – र.रु.57,21,22,789/- |
| सन 2022-2023 ची जमा | - र.रु.39,15,91,591/- |
| शिल्लकेसह एकूण जमा | - र.रु.96,37,14,380/- |
| सन 2022-2023 चा खर्च | -र.रु. 79,95,19,437/- |
| अखेर शिल्लक | - र.रु.16,41,94,943/- |

तरी सदर वार्षिक लेख्यास मंजूरी देत आहे.याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 13/07/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. 45

विषय – विटा नगरपरिषद प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कम योजनेअंतर्गत मंजुर निधीतून स्वच्छ सर्वेक्षण कामी citizen engagement, citizen impact वाढविणेसंबंधी विविध प्रकारची कामे करणे, त्यासंबंधी डॉक्युमेंट तयार करणे व सादर करणेकरीता संस्था नियुक्त करणे कामास मंजुरी देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरीक्षक यांची दि.12/07/2023 रोजी मंजुर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेस स्वच्छ सर्वेक्षणामध्ये उच्चतम कामगिरी करणा-या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणा-या प्रोत्साहनात्मक बक्षिस 7.5 कोटी प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक स्वमअ-2019/प्र.क्र.94/नवि34 दि.25/07/2019 च्या शासन निर्णयानुसार स्वच्छ सर्वेक्षणांच्या व कचरा मुक्त शहरांच्या तारांकीत मानांकनाच्या अनुषंगिक आवश्यक कामे करण्यासाठी संस्था नेमणे करिता मुख्याधिकारी ( ब वर्ग नगरपरिषद) यांना 10 लक्ष पर्यंत खर्च अधिकार देणेत आला आहे.

विटा नगरपरिषदेस स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्ये प्रभागनिहाय माहिती देणे आवश्यक आहे. परंतु यावर्षी स्वच्छ भारत मिशन यांचेमार्फत निवडणूक प्रभागाप्रमाणे कामे करण्याचे आदेश आहेत. तसेच स्वच्छ सर्वेक्षण, ओ.डी. एफ. व कचरा मुक्त शहरांच्या तारांकित मानांकन याकरिता आवश्यक असणारे परिमाणांमध्येही बदल झाला आहे. याकरिता स्वच्छ सर्वेक्षणच्या व कचरा मुक्त शहरांच्या तारांकीत मानांकनाच्या अनुषंगिक आवश्यक कामे कामे करण्यासाठी संस्था नेमणे बाबत उदा. या कामांसाठी शहरास मदत करण्यासाठी संस्थेची संस्थांची / नियुक्ती करणे, प्रचार प्रसिद्धी इत्यादी करिता संस्था नेमणे आवश्यक वाटते.

सन 2018-19 स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणा-या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणा-या प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कम अंतर्गत विटा नगरपरिषदेस सन 2018-19 व 2019-20 साठी अनुक्रमे र.रू.5 कोटी व र.रू.10 कोटी इतके मंजूर झाले आहे. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.नपावै-2021/प्रक्र.195(4)/नवि-16 मंत्रालय, मुंबई – 400032 दि.23/11/2021 नुसार सन 2018-19 व 2019-20 साठी दुसरा हप्ता एकूण र.रू.7.50 कोटी इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे.

तरी उक्त अनुदान विनियोगाबाबतची कार्यपद्धती महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं.स्वमअ- 2019 / प्र.क्र.94 /नवि-34 दि. 18 सप्टेंबर 2019 शासन निर्णयातील विवरण पत्रातील अनुशेष कामांच्या पैकी मुद्दा क्रं. 4 अंतर्गत व उर्वरीत आवश्यक निधी हा नगरपरिषदेच्या स्व निधीतून स्वच्छ सर्वेक्षण कामी citizen engagement, citizen impact वाढविणेसंबंधी विविध

प्रकारची कामे करणे, त्यासंबंधी डॉक्युमेंट तयार करणे व सादर करणेकरीता संस्था नियुक्त करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 13/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 46

विषय – सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद कर्मचा-यांना गणवेश पुरविणेकामी कापड पुरवठा करणे, गणवेश शिलाई करणे, महीला कामगारांना साडया, कर्मचा-यांना सेफ्टी शुज पुरवठा करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 12/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद कर्मचा-यांना गणवेश पुरविणेकामी कापड पुरवठा करणे, गणवेश शिलाई करणे, महीला कामगारांना साडया, कर्मचा-यांना सेफ्टी शुज पुरवठा करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

1) श्रेया कलेक्शन, विटा
2) श्रेया ट्रेडींग, विटा
3) देवांन क्लॉथ स्टोअर्स, विटा

उपरोक्त निविदापैकी श्रेया ट्रेडींग, विटा यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 13/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 47

विषय – सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळाकडील मुलांना व मुलींना गणवेश खरेदी करणेकामी कापड खरेदी करून बचत गट उपलब्ध असलेस शिवून घेणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी सहा.भांडार पर्यवेक्षक यांची दिनांक 12/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळाकडील मुलांना व मुलींना गणवेश खरेदी करणेकामी कापड खरेदी करून बचत गट उपलब्ध असलेस शिवून घेणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

1) श्रेया ट्रेडींग, विटा

2) देवांन क्लॉथ स्टोअर्स, विटा

3) श्रेया कलेक्शन, विटा

उपरोक्त निविदापैकी श्रेया ट्रेडींग, विटा यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 13/07/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.48

विषय – केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SVA Nidhi) योजनेअंतर्गत “स्वनिधी से समृध्दी” कार्यक्रम राबविणेसाठी विटा नगरपरिषदे मार्फत प्रथम टप्पाचे कर्ज प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांचे socio – economic profiling करणेसाठी प्रत्यक्ष ऑनलाईन सर्वेक्षण करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ – मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दि.12/07/2023 रोजी मंजुर केलेली टिपणी.

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SVA Nidhi) योजनेअंतर्गत “स्वनिधी से समृध्दी” कार्यक्रम राबविणेसाठी विटा नगरपरिषदे मार्फत प्रथम टप्पाचे कर्ज प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांचे socio – economic profiling करणेसाठी प्रत्यक्ष ऑनलाईन सर्वेक्षण करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

1) इको ग्रीन सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस — प्रति लाभार्थी रक्कम रू 65/-
2) राजमुद्रा फाऊंडेशन — प्रति लाभार्थी रक्कम रू 75/-
3) अनंत एन्टरप्रायजेस — प्रति लाभार्थी रक्कम रू 80/-

उपरोक्त निविदापैकी इको ग्रीन सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 13/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 49

विषय – सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता आरोग्य विभागासाठी घंटागाडीसाठी घरगुती घातक कच-यासाठी बॉक्स तयार करणे व सुक्या कच-यासाठी पिशव्या तयार करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरीक्षक यांची दिनांक 12/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता आरोग्य विभागासाठी घंटागाडीसाठी घरगुती घातक कच-यासाठी बॉक्स तयार करणे व सुक्या कच-यासाठी पिशव्या तयार करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

1) सानिया सुहाना फॅब्रिकेशन, विटा

2) सुपर फॅब्रिकेशन, विटा

3) वसिम फॅब्रिकेशन, विटा

उपरोक्त निविदापैकी सानिया सुहाना फॅब्रिकेशन, विटा यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 13/07/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.50

विषय – मा. जिल्हा सह आयुक्त यांचे कडील आदेशानुसार विटा नगरपरिषदेचे वर्ग-3 मधील कार्यरत पात्र कर्मचारी यांना सेवजेष्ठते नुसार "वरिष्ठ लिपिक" या रिक्त पदावर पदोन्नतीने समितीने निवड केलेल्या कर्मचा-यांची नेमणूक करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आस्थापना प्रमुख यांची दिनांक 10/07/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेच्या आस्थापनेवर मंजूर आकृत्तीबंधा नुसार "वरिष्ठ लिपिक" या पदाची 6 पदे मंजूर असून मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. नपप्रसं/प्रलंबित पदनि/प्र. क्र. 206/2013/का.6/दिनांक 26 एप्रिल-2013 चे परिपत्रक नुसार सरळ सेवा भरती व पदोन्नतीने नियुक्ती साठीचे प्रमाण 25:75 टक्के निश्चित केले आहे. त्यानुसार 4 पदे सेवा ज्येष्ठता नुसार पदोन्नतीने व 2 पदे अंतर्गत भरती/सरळसेवेद्वारे भरतीसाठी निश्चित केलेली आहेत. मा.मागासवर्ग कक्ष पुणे यांचेकडील एस.आर.रजिस्टर क्रं. 999 दिनांक.08/02/2023 नुसार बिंदू नामावली तपासणी केलेली आहे. त्यानुसार "वरिष्ठ लिपिक" हे पद कार्यरत कर्मचाऱ्यांमधून सेवाजेष्ठता नुसार स्थायी निदेश 23 अ नुसार नगरपरिषदेने पदोन्नतीने भरण्याकरिता भरतीची प्रक्रिया दि.10/04/2023 रोजी नोटीस बोर्डवर जाहीर प्रसिद्ध केली होती. सदर पदासाठी नगरपरिषद कर्मचाऱ्यांमधून 9 अर्ज प्राप्त झालेले आहेत. पदोन्नती भरतीने "वरिष्ठ लिपिक" पदावर नेमणुकीसाठी शैक्षणिक अर्हता उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व टंकलेखनाचे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र. 30 श.प्र.मि.मराठी,40 श.प्र.मि.इंग्रजी, एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम प्रमाणपत्र, मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान,लिपिक टंकलेखक पदावरील किमान 12 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक, न.प. सेवेत आल्यानंतर संचालनालयाने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक, विभागीय परीक्षा विहित केली गेली नसल्यास एल.जी.एस.प्रमाणपत्र आवश्यक, तसेच सरळसेवा / अंतर्गत पदभरतीसाठी शैक्षणिक अर्हता शासनमान्य विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर व टंकलेखनाचे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र. 30 श.प्र.मि.मराठी,40 श.प्र.मि.इंग्रजी, एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम प्रमाणपत्र, मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान, न.प. सेवेत आल्यानंतर संचालनालयाने विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक, विभागीय परीक्षा विहित केली गेली नसल्यास एल.जी.एस.प्रमाणपत्र आवश्यक, एल.जी.एस. ची शैक्षणिक पात्रता धारण करण्याची अट 45 वर्षाहून अधिक वय पूर्ण करणाऱ्या

कर्मचाऱ्याच्या बाबतीत शिथिल केली आहे. या नुसार नगरपरिषदेकडे प्राप्त झालेल्या अर्जानुसार “वरिष्ठ लिपिक” पदोन्नती भरतीकामीचा प्रस्ताव जिल्हा निवड समितीकडे सविनय सादर केला होता.

“वरिष्ठ लिपिक” पदोन्नती भरतीकामीच्या प्रस्तावास जिल्हा पदोन्नत्ती निवड समितीने प्राप्त अर्जांची छाननी करून क्र. नवि/कार्या-03/पदोन्नती/251/2023 जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली दि.05/07/2023 चा आदेश प्राप्त झाला आहे.

तसेच “वरिष्ठ लिपिक” सरळसेवा/ अंतर्गत पदभरती कामीच्या प्रस्तावास जिल्हा सरळसेवा/पदोन्नत्ती निवड समितीने प्राप्त अर्जांची छाननी करून क्र. नवि/कार्या-03/अंत.भ.पदोन्नती/254/2023 जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली दि.07/07/2023 चा आदेश प्राप्त झाला आहे. सदर आदेशास स्थायी निदेश क्र.20 मधील 9 व 10 नुसार मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा